निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २३५ वा.
बुधवार :२९ ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील लाभाच्या उपक्रमांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ

**मुंबई**/ हवामान बदलाचे अनेक परिणाम राज्यातील शेतीवर होत असून शेतकरी वर्गाला मोठा फटका बसत आहे. अशा परिस्थितीत बदलत्या हवामानाला तोंड देत शेती अधिक किफायतशीर करण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करणे गरजेचे असल्याचे महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेच्या सहकार्याने कृषी विभागाच्या माध्यमातून हवामान अनुकूल शेती विकासाचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आणि शेतकरी गटांना लाभ देण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या डीबीटी प्रणालीचे अनावरण करून प्रकल्पातील उपक्रमांचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ,वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उद्योगमंत्री उदय सामंत, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कृषी राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल,मुख्य सचिव राजेशकुमार, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंह आणि प्रकल्प कार्यालयातील तसेच मंत्रालयीन अधिकारी उपस्थित होते.

वेगाने होत असलेल्या हवामान बदलामुळे राज्यातील शेतीवर प्रतिकूल परिणाम होत असून पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. राज्यातील ८२ % जमीन कोरडवाहू असल्यामुळे पिकांच्या वाढीच्या अवस्थेत पडणारा पावसातील खंड पिकांच्या उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम करतो. त्याबरोबरच अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे शेतीचे आणि पिकांचे मोठे नुकसान होते. या सगळ्याचा फटका सर्वच शेतकऱ्यांना आणि विशेषतः अल्प व अत्यल्प भूधारकांना सहन करावा लागतो. वाढते तापमान, अनियमित पाऊस, तीव्र टंचाई, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि दिवसेंदिवस कमी होत असलेली जमीनधारणा यामुळे शेतीमधील जोखीम वाढली आहे. अशा प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीशी सामना करण्यासाठी शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढविण्याबरोबरच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे अत्यावश्यक झाले आहे.

त्याबरोबरच युवक व महिलांचा शेतीव्यवसायाच्या निर्णयप्रक्रियेमध्ये सहभाग वाढविणे गरजेचे झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जागतिक बँकेच्या सहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याचे ठरवले आहे.

शेतकऱ्यांसाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धती

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील प्रकल्प गावामध्ये शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांचा वैयक्तिक शेतीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. यामध्ये पाण्याच्या व्यवस्थेसाठी नवीन शेततळे, अस्तरीकरण, तुषार व ठिबक सिंचन, विहिरींचे पुनर्भरण, सेंद्रिय खत निर्मिती, फळबाग लागवड, बांबू व वृक्ष लागवड, रेशीम उद्योग, संरक्षित शेती, संवर्धित शेती, बिजोत्पादन इ. हवामान अनुकूल घटकांसाठी डीबीटीद्वारे केंद्र व राज्य शासनाच्या मापदंडानुसार अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

५ हेक्टर पर्यंत जमीनधारणा असलेल्या शेतकऱ्यांना हे सर्व लाभ मिळतील. मात्र बिजोत्पादन घटकाचा लाभ घेण्यासाठी कमाल जमीन मर्यादेची अट राहणार नाही. भूमिहीन कुटुंबांना तसेच विधवा, घटस्फोटीत आणि परित्यक्त्या महिलांना उपजीविकेचे साधन निर्माण व्हावे म्हणून शेळीपालन आणि परसातील कुक्कुटपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या घटकांचा लाभ घेणे सुलभ आणि कागदविरहित व्हावे म्हणून थेट लाभ हस्तांतरण पद्धती (डीबीटी )तयार करण्यात आली आहे. प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या महाविस्तार ए आय या मोबाईल ॲपद्वारे किंवा ह्रींीि:// वलीं-पवज्ञी.रिहर्रेलीर.सीं.ळप/ या प्रकल्पाच्या पोर्टलवर जाऊन अर्ज करता येणार आहेत.

त्याचबरोबर शेतीमधील खर्च कमी करण्यासाठी, शेतमालावर आधारित कृषी प्रक्रिया व्यवसाय, गावामध्ये साठवणूक सुविधा, कृषी औजारे, बँका उभारण्यासाठी शेतकरी गट स्तरावर मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता असते. म्हणून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत शेतकरी गटांना व कंपन्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी देखील थेट लाभ हस्तांतरण पद्धती तयार केली आहे. शेतकरी गट आणि कंपन्यांना प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठी पोर्टलवर अर्ज करता येणार आहे.

बदलत्या हवामानाचा शेतीवर होत असलेल्या प्रतिकूल परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना आवश्यक सहाय्य



करण्यास शासन कटिबद्ध आहे तरी शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपली शेती हवामान अनुकूल करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

हवामानानुसार पिकांच्या फेरपालटचा समन्वय साधणारा प्रकल्प - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, राज्यातील लाखो शेतकऱ्यांना या प्रकल्पाचा थेट लाभ मिळणार आहे. जलसंधारण, सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती, सूक्ष्म सिंचन आणि हवामानानुसार पिकांची फेरपालट यांचा समन्वय साधणारा हा प्रकल्प म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्याचे एक ठोस पाऊल आहे. महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, आणि हा उपक्रम त्या विश्वासाचा विस्तार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हानिहाय नोडल अधिकारी नेमण्याचा निर्णय या प्रसंगी घेण्यात आला. या प्रकल्पामुळे राज्याच्या कृषी विकासाला नवी दिशा मिळणार असून हा उपक्रम फक्त शेतकऱ्यांचा नव्हे, तर महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा प्राणवायू ठरेल. या प्रकल्पाद्वारे हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देणाऱ्या तंत्रज्ञानांचा वापर, जैवविविधतेचे संवर्धन, आणि शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. कृषी विभागाने या प्रकल्पासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारला असून, जलव्यवस्थापन, मृदसंधारण, सौरऊर्जेचा वापर आणि पिकांच्या विविधीकरणास विशेष प्राधान्य दिले असल्याचे कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्र एआय धोरण २०२५-२०२९ अंतर्गत 'कॉल फॉर प्रपोझल पोर्टल'चे उद्घाटन

कृषी विभागामार्फत महाराष्ट्र एआय धोरण २०२५-२०२९ अंतर्गत 'कॉल फॉर प्रपोझल' या पोर्टलचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाद्वारे कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), ड्रोन तंत्रज्ञान, आणि डेटा-आधारित उत्पादन व्यवस्थापन यासारख्या अत्याधुनिक साधनांच्या वापराला चालना मिळणार आहे. या पोर्टलद्वारे स्टार्टअप्स, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई), शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) आणि संशोधन संस्था आपल्या तंत्रज्ञानाधारित कल्पना सादर करून शाश्वत शेतीसाठी नवे उपाय सादर करू शकतील. या उपक्रमाचे कौतुक करत कृषी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे यशस्वी संमिश्रण हे महाराष्ट्राच्या शेतीसाठी परिवर्तनकारी ठरेल असा विश्वास कृषी मंत्री भरणे यांनी व्यक्त केला.

# ८ व्या वेतन आयोगाला मंजूरी; ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०२६ पासून लागू होणार

केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाला मान्यता दिली आहे. तीन सदस्यीय आयोग १८ महिन्यांत त्यांच्या शिफारशी सादर करेल. ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ९६ लाख पेन्शनधारकांना या ८ व्या वेतन आयोगाचा लाभ मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंदर्भातील प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. सरकारने जानेवारीमध्ये आठव्या वेतन आयोगाला मान्यता दिली होती, परंतु तो आताच स्थापन करण्यात आला आहे.

बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घोषणा केली की केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मान्यता दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश रंजना प्रकाश देसाई अध्यक्ष असतील. आयआयएम बंगळुरूचे प्राध्यापक पुलक घोष अर्धवेळ सदस्य असतील. सध्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव म्हणून काम करणारे पंकज जैन हे त्याचे सदस्य सचिव असतील.

आठवा केंद्रीय वेतन आयोग ही एक तात्पुरती संस्था असेल. स्थापनेच्या तारखेपासून १८ महिन्यांच्या आत त्यांना त्यांच्या शिफारसी सादर कराव्या लागतील. आयोगात एक अध्यक्ष, एक अर्धवेळ सदस्य आणि एक सदस्य-सचिव असतील. आवश्यक असल्यास, आयोग कोणत्याही विषयावर त्यांच्या शिफारसी अंतिम करण्याच्या मध्यभागी त्यांचा अहवाल सादर करू शकतो.

भारतात दर १० वर्षांनी वेतन आयोग असतो. ७ वा वेतन आयोग फेब्रुवारी २०१४ मध्ये स्थापन झाला. १ जानेवारी २०१६ पासून लागू झाला. पुढील अद्यतन २०२६ साठी नियोजित आहे. कर्मचाऱ्यांच्या पगारावर महागाईचा परिणाम होऊ नये म्हणून, सरकार दर सहा महिन्यांनी महागाई भत्ता (डीए) अद्यतनित करते. नवीन वेतन रचनेनंतर जर डीएमध्येही सुधारणा झाली, तर टेक-होम पगार आणखी वाढेल.

**आठव्या सीपीसीमध्ये कशावर लक्ष केंद्रित केले जाईल?**


आयोग आपला अहवाल तयार करताना अनेक प्रमुख मुद्द्यांचा विचार केला जाईल जसे की देशाची आर्थिक स्थिती आणि राजकोषीय शिस्त. विकास आणि कल्याणकारी खर्चासाठी पुरेसे संसाधने. अंशदान नसलेल्या पेन्शन योजनांचा भार. राज्यांचे आर्थिक आरोग्य कारण ते अनेकदा शिफारसी स्वीकारतात. केंद्रीय सार्वजनिक उपक्रम आणि खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची तुलना. एका अर्थाने, हे आयोग केवळ पगार वाढवण्यासाठीच नाही तर आर्थिक संतुलन आणि कर्मचारी कल्याण यांच्यातील योग्य मार्ग निवडण्यासाठी देखील जबाबदार असेल.




**आठवा वेतन आयोगाचा कधी लाभ मिळेल?**

सरकारने स्पष्टपणे सांगितले आहे की आयोगाच्या शिफारशी अंतिम झाल्यानंतर आणि सरकारने मान्यता दिल्यानंतरच नवीन वेतनश्रेणी लागू केल्या जातील. १ जानेवारी २०२६ पासून याचा लाभ मिळू शकते. कर्मचारी संघटना बऱ्याच काळापासून ही मागणी करत आहेत. त्यामुळे, टीओआर मिळाल्यानंतर त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे. या बदलामुळे पेन्शनधारकांनाही मोठा दिलासा मिळू शकतो.

## मालवणी भाषेला स्वतंत्र ओळख देणारा सर्जनशील नाटककार गमावला - उपमुख्यमंत्री अजित पवार



**मुंबई**/ 'वस्त्रहरण' नाटकाच्या माध्यमातून मालवणी भाषेला मराठी रंगभूमीवर स्वतंत्र ओळख देणारे, ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांच्या निधनाने मराठी रंगभूमीसह मालवणी नाट्यजगताने प्रतिभावान, संवेदनशील आणि सर्जनशील नाटककार गमावला आहे, अशा शोकभावना व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर हे मराठी रंगभूमीवरील प्रादेशिक नाट्यसंस्कृतीचे निष्ठावंत वाहक होते. त्यांनी मालवणी बोलीतील अस्सल जीवन, लोकसंस्कृती, विनोद आणि भावविश्व आपल्या लेखणीतून रंगमंचावर जिवंत केले. 'वस्त्रहरण' या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी मराठी रंगभूमीला नवा आयाम देत प्रादेशिक भाषेतील नाटकांना मुख्य प्रवाहात स्थान मिळवून दिले. त्यांची नाटके ही केवळ मनोरंजन करणारी नव्हती, तर समाजमनाला स्पर्श करणारा आरसा होती. ग्रामीण माणसाच्या जगण्यातील वेदना, विनोद आणि संघर्ष त्यांनी अत्यंत वास्तवतेने मांडल्या. त्यांच्या निधनाने आपण ज्येष्ठ नाटककार गमावला आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी असून गवाणकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी म्हटले आहे.

# फेब्रुवारीमध्ये जागतिक स्तरावरील 'मुंबई क्लायमेट वीक'चे मुंबईत आयोजन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई** / वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह - 'मुंबई क्लायमेट वीक' ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

हा महत्त्वाकांक्षी उपक्रम 'प्रोजेक्ट मुंबई' या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते. यावेळी 'मुंबई क्लायमेट वीक' च्या लोगोचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

विकसनशील देशांतील वातावरणीय बदल, अन्न व ऊर्जा टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून विकास आणि पर्यावरणीय कृती यांच्यात संतुलन साधण्यासाठी तो प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई क्लायमेट वीकचा मुख्य कार्यक्रम १७ ते १९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडेल. त्याचबरोबर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता यावे, यासाठी शहरभर विविध प्रदर्शने, कार्यशाळा, चित्रपट, कला, क्रीडा, आरोग्य आणि अध्यात्म यांच्याशी निगडीत उपक्रम, आणि क्लायमेट फूड फेस्टिव्हल सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या परिषदेत ग्लोबल साऊथमधील ३० पेक्षा अधिक देशांमधील प्रतिनिधी सहभागी होणार असून यामध्ये व्यवहार्य असा हवामान बदल कृती कार्यक्रम तयार करण्यात येईल. विशेष म्हणजे हा कार्यक्रम राज्यांचे मुख्यमंत्री, विविध शहरांचे प्रतिनिधी, उद्योग, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि युवक यांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई क्लायमेट विकच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई हवामान सप्ताह कृतीसह नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृढनिश्चयाचे प्रदर्शन करतो. माननीय पंतप्रधानांनी ठरवलेल्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन, मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक दक्षिणेसाठी न्याय्य, नाविन्यपूर्ण, चांगल्या निधीसह हवामान भविष्य घडवण्यास मदत करण्यास तयार आहेत.

## - १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजन
## -तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्त्यांचा समावेश

ग्लोबल साउथमधील वातावरणीय कृती आणि सहकार्य या क्षेत्रामधील भारताचे नेतृत्व सिद्ध करणारे मुंबई क्लायमेट वीक हे मोठे व्यासपीठ ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईत पहिल्यांदाच मुंबई क्लायमेट वीक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. आता कृती करण्याची वेळ आली आहे.

यासाठी आपण समाजातील प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक व्यवसायाला आणि जीवनाच्या सर्व स्तरांना हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागणार आहे. तसेच त्यांना कृतींद्वारे बदल कसे कमी करायचे हे प्रत्यक्षात सांगावे लागणार आहे.

मुंबई क्लायमेट वीक कार्यक्रम आयोजित केल्यानंतर आपल्याला महाराष्ट्र आणि मुंबईसाठी बेंचमार्क देखील निश्चित करावे लागतील, हवामान बदलाच्या क्षेत्रात कृती करण्यासाठी काही ध्येये निश्चित करावी लागतील. त्यासाठी आजपासून कृती सुरू करूया असेही ते म्हणाले.

तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्ते मुंबई क्लायमेट वीकच्या व्यासपीठावर एकत्र येऊन वातावरणीय बदलावरच्या सर्वंकष आणि व्यवहार्य उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करतील. हा उपक्रम भारत आणि विकसनशील राष्ट्रांचा आवाज जागतिक स्तरावर पोहोचविणारा ठरेल, असेही ते म्हणाले.

मुंबई क्लायमेट वीकचा भर अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी सक्षमता या तीन प्रमुख विषयांवर असेल. न्याय, नवोन्मेष आणि वित्तीय दृष्टीकोनातून हे विषय सखोलपणे मांडले जातील.

'प्रोजेक्ट मुंबई'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी कार्यक्रमाबद्दल माहिती देताना सांगितले की, मुंबई क्लायमेट वीक हा महाराष्ट्र आणि भारतासाठी एक ऐतिहासिक टप्पा असणार आहे. वातावरणीय बदलाला तोंड देण्यासाठी लोकसहभागावर आधारित असे शाश्वत आणि समावेशक उपाय या परिषदेतील मंथनातून तयार होतील.

या उपक्रमाचे नॉलेज पार्टनर मॉनिटर डिलॉईट असणार असून क्लायमेट ग्रुप, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिस्ट्यूट (इंडिया), एव्हरसोर्स, एचटी पारेख फाऊंडेशन, युनिसेफ, शक्ती फाऊंडेशन, रेनमॅटर फाऊंडेशन, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट आणि राष्ट्रीय सेवा योजना यासारख्या संस्था यात सहभागी होणार आहेत.

मुख्यमंत्री कार्यालयातील यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे, प्रोजेक्ट मुंबईचे सल्लागार मंडळ सदस्य रिधम देसाई, जलज दाणी आदी यावेळी उपस्थित होते.

## जागतिक इंटरनेट दिन.....

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. इंटरनेट शिवाय कोणी राहू शकत नाही एकवेळ माणूस अन्नापाण्याशिवाय राहील पण इंटरनेटशिवाय नाही इतकी इंटरनेट आज जीवनावश्यक गोष्ट बनली आहे. आपला इंटरनेट पॅक अचानक संपला तर आपली काय अवस्था होते हे तपासून पहा. असं कोणतेच क्षेत्र नाही जिथे इंटरनेटचा वापर होत नाही सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातो म्हणूनच इंटरनेट आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झालं मात्र असलं तरी त्याच्या कितीतरी आधी अमेरिकेत आणि युरोपात इंटरनेटचा वापर केला जात होता. २९ ऑक्टोबर १९६९ रोजी इंटरनेटवरचा पहिला संदेश पाठवला गेला म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक इंटरनेट दिवस म्हणून मानला जातो . इंटरनेटवर पहिला संदेश पाठवला त्याला आज बरोबर ५६ वर्ष पूर्ण झाली. या ५६ वर्षात इंटरनेटमुळे जगात अनेक क्रांतिकारी बदल झाले मात्र इंटरनेटवर पहिला संदेश कसा पाठवला गेला हे पाहणे खूप मनोरंजक आहे. १९६० चा दशकात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध चालू होते अमेरिकन सैन्याला इंटरनेट व्यवस्था सारखी गुप्त व्यवस्था संदेशवहनासाठी हवी होती. अशी यंत्रणा स्थापन करण्यासाठी अमेरिकन संरक्षण खात्याने एका संशोधन प्रकल्पाला मोठ अर्थसहाय्य देऊन अमेरिकेतील काही विद्यापीठाकडे त्या संशोधनाचे काम सोपवल. या प्रकल्पासाठी एकूण चार संगणक अमेरिकेतील चार विद्यापीठात जोडण्यात आले. त्या चार संगणकातच जगातील पहिलं इंटरनेट होत. या चार संगणकांपैकी एक होता कोलिफॉर्निया लॉस एंजेलिस विद्यापीठात, दुसरा होता स्टॅनफोर्ड विद्यापीठात तिसरा होता सांता बार्बरा विद्यापीठात तर चौथा होता उता विद्यापीठात. एका संगणकातून दिला जाणारा संदेश इंटरनेटद्वारे दुसऱ्या संगणकात पोहचतो असे संशोधन या प्रकल्पातील तज्ज्ञांनी केले होते त्याची चाचणी या चार संगणकाद्वारे केली जाणार होती. अर्थात त्याकाळी आजच्या इतके प्रगत तंत्रज्ञान नव्हते. संगणकाचे मॉनिटर तर हिरव्याजर्द अक्षरांनी चमकणारे असत. कॉलिफॉर्नियामध्ये चार्ली क्लीने या संगणकप्रणाली निर्मात्याने एका संगणकावरून दुसऱ्या संगणकाला एकेक्ट्रोनिक संदेश पाठवला. पहिल्या वेळी पाठवलेल्या श्रेस ळप शब्दापैकी श्रे शब्द पोहचल्यावर सिस्टीम फेल झाली. पुढील अक्षरे पोहचू शकली नाहीत मात्र अर्धवट का होईना संदेश पोहचला ही बाब दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवणारी ठरली. हा दिवस माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुवर्ण दिन ठरला. म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक इंटरनेटदिन म्हणून साजरा केला जातो.

# प्रतिष्ठा महिलांच्या हाती......



क्रिकेट खेळल्या जाणाऱ्या देशांमध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) एक वेगळेच वलय आहे. सर्वाधिक श्रीमंत क्रिकेट मंडळ असा बीसीसीआयचा जगभरात नावलौकिक आहे. भारतीय क्रिकेट संघामध्ये सुरुवातीपासूनच अनेक नावलौकिक प्राप्त खेळाडूंचा समावेश राहिला आहे. क्रिकेट खेळातील अनेक विक्रम भारतीय खेळाडूंच्या नावावर आहेत. अन्य देशातील क्रिकेट खेळाडूंच्या तुलनेत भारतीय खेळाडूंना मिळणारे मानधन अधिक आहे. पूर्वी भारतीय क्रिकेटमध्ये पुरुष आणि महिला संघांच्या मानधनामध्ये विषमता होती.

पण बीसीसीआयची सूत्रे जय शहा यांच्याकडे गेल्यानंतर बीसीसीआयचा चेहरा-मोहरा बदलण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. महिला क्रिकेटपटूंनाही आता पुरुष खेळाडूंच्या बरोबरीने मानधन मिळण्यास सुरुवात झाल्याने मानधनातील दुजाभाव संपुष्टात आला आहे. भारतीय पुरुष क्रिकेट संघामध्ये मागील अनेक वर्षांपासून एकाहून एक अशा अनेक मातब्बर खेळाडूंचा समावेश राहिलेला आहे व आजही भारतीय क्रिकेट पुरुष संघामध्ये समावेश होण्यासाठी कमालीची चुरस निर्माण झालेली आहे. अनेक दर्जेदार, गुणवंत खेळाडू खेळाचा क्लास असताना व दर्जामध्ये सातत्य असताना प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. एकेकाळी डायना एडल्जी, मिताली राजसारख्या मोजक्याच खेळाडूंमुळे भारतीय महिला क्रिकेटच्या संघाची ओळख असायची, पण अलीकडच्या काळात भारतीय महिला क्रिकेट संघाने कात टाकल्याप्रमाणे प्रगती केली आहे. भारतीय महिला संघाची एक दर्जेदार संघ म्हणून ओळख होत असून एक आक्रमक चेहरा भारतीय महिला क्रिकेट संघाला प्राप्त झाला आहे. अनेक विक्रम भारतीय महिला क्रिकेटर्सच्या खात्यात जमा असून अनेक दिग्गज संघांना सामन्यांमध्ये भारतीय महिला क्रिकेटर्सने आपल्या कामगिरीच्या बळावर पाणी पाजले आहे. सध्या भारतीय क्रिकेटमधील पुरुष आणि महिला संघाची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. भारतीय पुरुष संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतीय संघाची फारशी प्रभावी कामगिरी झालेली नाही. एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत सलग दोन सामने भारताला गमवावे लागले असून मालिकाही भारताला गमवावी लागली आहे. विराट कोहली, कर्णधार शुभमन गिल या दिग्गज खेळाडूंच्या फलंदाजीतील अपयशामुळे भारतीयांची चिंता वाढली आहे.

गोलंदाजांनाही फारशी प्रभावी कामगिरी करता आलेली नाही. अर्थात ऑस्ट्रेलियामध्ये जाऊन त्यांना पराभूत करणे एक अग्निदिव्यच आहे. त्यात फलंदाजीला अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर २६५ धावांचे रक्षण करणे कोणत्याही संघातील गोलंदाजांसाठी अवघड काम आहे. त्यातल्या त्यात दुसऱ्या सामन्यामध्ये रोहित शर्माला गवसलेला सूर क्रिकेटप्रेमींना दिलासा देणारी बाब आहे. विराट कोहलीला दोन्ही सामन्यात खाते उघडता आले नाही, तर कर्णधार शुभमन गिलला दोन्ही सामन्यांतील आकडेवारी एकत्रित केली तरी २५च्या पार करता आलेली नाही.

शनिवारी, २५ ऑक्टोबर रोजी भारत व ऑस्ट्रेलियातील एकदिवसीय मालिकेतील अखेरचा सामना होत असून मालिकेतील व्हाईट वॉश टाळण्यासाठी व प्रतिष्ठा जपण्यासाठी भारताला अखेरच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला पराभूत करण्याची कामगिरी करून दाखवावी लागणार आहे. त्या तुलनेत महिला भारतीय क्रिकेट संघाची सध्या सुरू असलेल्या विश्वचषक स्पर्धेतील कामगिरी नक्कीच अभिमानास्पद आहे. विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिलांनी गुरुवारी न्यूझीलंडचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. विश्वचषकांचा संभाव्य विजेता म्हणूनही आज भारतीय महिला संघाकडे पाहिले जात आहे. दोनदा उपविजेतेपद आणि तीन वेळा उपांत्य फेरी. आयसीसी महिला विश्वचषकात आजवर विजयाच्या असे जवळ येऊनही भारताला विजेतेपदाचा आनंद साजरा करता आलेला नाही. उपांत्य फेरी व त्यापाठोपाठ फायनलचा सामना जिंकून पण हाच इतिहास बदलण्याची चांगली संधी भारताकडे चालून आलेली आहे.

विश्वचषक स्पर्धेदरम्यान भारतीय महिलांचा प्रवास हा अडथळ्याची मालिका पार करतच झालेला आहे. भारतीय संघाचा स्पर्धेतील प्रवास चढ-उतारांचा राहिला. त्यांनी श्रीलंकेविरुद्ध आणि पाकिस्तानविरुद्ध सलग विजय मिळवून विश्वचषक स्पर्धेत चांगली सुरुवात केली होती. मात्र, त्यानंतर दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडविरुद्ध त्यांना सलग तीन सामन्यांमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले.

अखेरीला न्यूझीलंडविरुद्धच्या प्रतिष्ठेच्या सामन्यात भारतीय महिलांनी प्रथम फलंदाजी करताना ३४० धावांपर्यंत मजल मारली व न्यूझीलंडला पावणेतीनशेच्या घरातच रोखत उपांत्य फेरीत प्रवेश केला. विश्वचषक स्पर्धे दरम्यान या स्पर्धेत भारतीय संघाने दाखवलेले धैर्य आणि जिद्द कौतुकास्पद आहे. सुरुवातीच्या पराभवानंतरही त्यांनी जोरदार पुनरागमन करत उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे. कर्णधार हरमनप्रीत कौर आणि तिच्या संघाने दाखवलेला आत्मविश्वास पुढील सामन्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका या बलाढ्य संघांसमोर भारतीय संघाला उपांत्य फेरीत कडवी झुंज द्यावी लागेल. मात्र, न्यूझीलंडविरुद्धच्या विजयाने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.आता सर्वांचे लक्ष या उपांत्य सामन्यांकडे लागले आहे, जिथे विश्वविजेतेपदासाठी चुरशीची लढत पाहायला मिळेल. भारतीय महिला संघाच्या फलंदाजीने दणकेबाज खेळी करत स्पर्धेमध्ये ३००चा आकडा अनेकदा पार केला आहे. स्मृती मानधनाने खेळीमध्ये दाखविलेल्या सातत्यामुळे मागील तीन सामन्यांमध्ये भारताला चांगली मजल मारणे शक्य झाले.

भारतीय क्रिकेट संघाची प्रतिष्ठा आता खऱ्या अर्थाने पणाला लागलेली आहे. पुरुष क्रिकेट संघाला आपली पत राखण्यासाठी आणि एकदिवसीय मालिकेतील व्हाईट वॉशची नामुष्की टाळण्यासाठी आजचा सामना जिंकावा लागणार आहे. महिला क्रिकेट संघ उपांत्य फेरीत पोहोचल्याने भारतीयांच्या आशा उंचावल्या आहेत. सध्या भारतीय महिला फलंदाजांना गवसलेला सूर पाहता व आक्रमक खेळी पाहता वर्ल्ड कप आता दूर नाही, अशी आशा बाळगायला वाव आहे.

# अर्थातच देश प्रगतिपथावर ठेवण्यासाठी आणि वैयक्तिक जीवनमान उंचावण्यासाठी तरुणाईला योग्य शिक्षण-प्रशिक्षण देण्याची मोठी गरज



इतर क्षेत्रांप्रमाणेच शिक्षणक्षेत्रातही माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून एक प्रकारची क्रांती अनुभवायला मिळत आहे. तांत्रिक विषयांसह इतरही सर्वच विद्याशाखांच्या अभ्यासकांना माहिती तंत्रज्ञानाने विविध प्रकारे सहाय्य केले आहे. खेरीज इलेक्ट्रॉनिक संवादमाध्यमे वापरून शाळा-कॉलेजांमध्ये दिल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणातही बदल घडले असून दूरशिक्षणासारखे मार्ग आता प्रत्येकाच्या आवाक्यात आले आहेत.

नव्या युगात शिक्षणक्षेत्रामध्ये नवतंत्रज्ञानाचे महत्त्व वाढले आहे. महत्त्वाचे म्हणजे हा बदल ग्रामीण भागातही पाहायला मिळत असून माहिती तंत्रज्ञानाने शिक्षणाच्या क्षेत्रात घडवून आणलेली क्रांती आपण सर्वजण पाहत आहोत. तांत्रिक विषयांसह इतरही सर्वच विद्याशाखांच्या अभ्यासकांना माहिती तंत्रज्ञानाने विविध प्रकारे सहाय्य केले आहे. खेरीज इलेक्ट्रॉनिक संवाद माध्यमे वापरून शाळा-कॉलेजांमध्ये दिल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणातही बदल घडले असून दूरशिक्षणासारखे मार्ग आता प्रत्येकाच्या आवाक्यात आले आहेत. ताज्या निष्कर्षानुसार सर्वाधिक तरुण लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक खूपच वरचा आहे. अर्थातच देश प्रगतिपथावर ठेवण्यासाठी आणि वैयक्तिक जीवनमान उंचावण्यासाठी तरुणाईला योग्य शिक्षण-प्रशिक्षण देण्याची मोठी गरज आहे. तरुणाईला विकास हवा आसल्याचे त्यांनी विविध मार्गांनी स्पष्ट केले आहे.

आजच्या शाळकरी तसेच कॉलेजवयीन विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा आहे; परंतु आतापर्यंतच्या धोरणांमुळे म्हणा वा अन्य कारणांनी म्हणा, त्यांना पुरेशी संसाधने पुरवण्यात यंत्रणा नेहमीच कमी पडली आहे. बरे रस्ते, अन्नपाणी, कपडे, वह्या-पुस्तके, घरातील परिस्थिती आणि आसपासचे वातावरण आदी सामाजिक-आर्थिक बाबींमध्ये अपूर्णत्व असूनही छोटी मुले-मुलीदेखील चार-चार मैल चालून शाळेत जाताना आपण पाहतो आणि हळहळतो, कारण सर्व संसाधने पुरवणे कधी कधी प्रशासनालाही अवघड असते. दुसरीकडे, बहुसंख्य विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या आणि खासगी शाळांमध्ये जातात, असा अनेकांचा समज असतो. काही अंशी हे खरे आहे. पण हे चित्र शहरी आणि तुलनेने संपन्न ग्रामीण भागात बघायला मिळते, हे विसरून चालणार नाही. आजही सर्वाधिक विद्यार्थी सरकारी शाळांमध्ये शिकतात आणि इतक्या व्यापक प्रमाणावर अशा प्रकारे शिक्षण पुरवणारी भारतातील सरकारी यंत्रणा जगात सर्वात मोठी आहे. मात्र इतक्या विस्तृत आणि सुस्थापित शैक्षणिक जाळ्यांचा वापर दर्जेदार शिक्षण देण्यासाठी केला जात नाही हे आपल्या यंत्रणेचे अपयश म्हणजे देशाचे दुर्दैव म्हणावे लागेल. या पार्श्वभूमीवर इंटरनेटने कशी क्रांती घडवली आहे ते पाहणे गरजेचे ठरते. ग्रामीण आणि दुर्गम भागातल्या विद्यार्थ्याला एखाद्या अभ्यासक्रमाची माहिती हवी असेल तर अगदी अलीकडेपर्यंत तो मिळेल त्या वाहनाने किंवा खरे तर बरेचदा चक्क चालतच तालुक्याचे गाव गाठत असे. तिथे एखादी चांगली शिक्षणसंस्था असेल तर ठीक, नाही तर पुन्हा प्रवास करून तो जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा शहरात येईल. संबंधित संस्थेचा पत्ता शोधून कार्यालयातून माहिती मिळवण्यात त्याचे दोन-तीन दिवस सहज जात. एवढ्या उद्योगानंतर त्याला योग्य ती माहिती मिळाली असेल तर ठीक, अन्यथा अजून कळले नाही, नोटीस निघालेली नाही, चार दिवसांनी फोन करा किंवा येऊन बोर्डावर पाहा असे उत्तर मिळाले की पुन्हा पुढच्या आठवड्यात हीच यात्रा काढण्याखेरीज पर्याय नसायचा. हा विद्यार्थी एकट्याने प्रवास करण्याइतका मोठा नसेल तर सोबतीला वडील, काका-मामा अशांना जावे लागायचे. म्हणजे दुप्पट खर्च आणि तेवढीच यातायात. इथे मुलींची म्हणजे विद्यार्थिनींची परिस्थिती तर आणखी बिकट व्हायची. मुलींनी शिकायचेच कशाला, मुलीच्या शिक्षणावर खर्च करून आमचा फायदा काय असे प्रश्न आपल्याकडे अजूनही विचारले जात असल्याने तिची पुढची शैक्षणिक वाट तर बहुधा बंदच होऊन जाते. मात्र अशा सरस्वतीच्या लेकीच्या आयुष्यात इंतरनेट महत्त्वाची क्रांती घडवू शकते, हे आता सर्वांना समजले आहे.विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी किंवा तो अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी आपण शिक्षणाचे दोन भाग करू या. शालांत परीक्षेपर्यंतचे आणि त्यानंतरचे, असे हे दोन भाग करता येतील. नंतरच्या शिक्षणामध्ये अधिक पर्याय असल्यामुळे समजून घेऊन त्यानुसार कृती करण्यात आणि विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याची दिशा ठरवण्यात माहिती तंत्रज्ञान मोठी भूमिका बजावते. शिक्षा अभियानासंबंधी माहिती देणाऱ्या या वेबसाइट्स वापरून एखाद्या राज्यातील एखाद्या तालुक्यामध्ये कोणत्या शाळा, कोणत्या गावात आहेत हे शोधता येते. आयुष्यात एका टप्प्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षण सोडावे लागते ते त्यासाठी येणाऱ्या खर्चामुळे. सध्या उच्चशिक्षण, तर भयंकर महाग होत चालले आहे.

अशा वेळी पात्र आणि हुशार विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्या अर्थात स्कॉलरशिप्स पुरवणाऱ्या असंख्य व्यक्ती आणि संस्था आहेत. इंटरनेटच्या कृपेने झाडून अशा साऱ्या शिष्यवृत्त्यांची माहिती काही क्लिक्समध्ये झटपट मिळू शकते. यासाठी स्कॉलरशिप्स किंवा फ्रीशिप्स असा सर्च द्यावा. अर्थात हे काम करण्यासाठी आपण 'शिक्षा'च्या वेबसाइटचाच वापर केला पाहिजे असे नाही; हा शोध सर्च इंजिन उघडून स्वतंत्रपणेही घेता येतो. शिक्षणक्षेत्रात आयटीचा इतक्या खोलवर शिरकाव झाल्याने विद्यार्थ्यांना करावी लागणारी अनुत्पादक पायपीट आणि खर्चात मोठी बचत झाली असून अधिक नेमकपणाने संस्थांची निवड करणे आता शक्य झाले आहे. अशा उपक्रमांमध्ये प्रौढ शिक्षण, कामगारांसाठीच्या रात्रशाळा तसेच अपंग आणि विकलांग विद्यार्थ्यांनाही नवतंत्राचा खूपच फायदा मिळू शकतो. आजच्या तरुणाईसाठी 'करिअर' हा शब्द अतिशय महत्त्वाचा ठरतो. या शब्दाचे ढोबळमानाने भाषांतर 'उपजीविकेसाठी केलेले काम किंवा व्यवसाय' असे होत असले तरी एखाद्याच्या जीवनशैलीच्या आणि मुख्य म्हणजे जीवनपद्धतीच्या संदर्भात करिअर या शब्दाचे नव्हे, तर संकल्पनेचे वजन निश्चितच जास्त भरते. आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम केल्याने मिळणारे मानसिक समाधान किती मोलाचे असते हे आणि असे अनेक मुद्दे यावेळी विचारात घेतले जातात. मात्र व्यावहारिक पातळीवर पाहता केलेल्या कामातून मिळणारे उत्पन्न हाच निकष बहुसंख्य प्रकरणांमध्ये पाळलेला आढळतो. याच अर्थाने 'करिअर' या संकल्पनेचा विचार केला आणि जरा मागे वळून पाहिले तर गेल्या शतकात म्हणजे सन २०००च्या थोडे आधीपर्यंत इंजिनीअर होणे ही बहुतेकांची महत्त्वाकांक्षा असे, असे म्हणता येईल; परंतु एकविसाव्या शतकाची सुरुवातच सर्वांचे जीवन व्यापणाऱ्या संगणक आणि संगणकाधारित प्रणालींनी झाली आणि इच्छुकांना करिअर करण्यासाठी सापडलेला नवा पैलू, नवे क्षेत्र म्हणजे कॉम्प्युटर.

कॉम्प्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन आणि या तिघांचे त्रिकूट जमल्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. खासगी, व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रांबरोबरच गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये सरकारी विभागही संगणकीय सेवासुविधांवर चालू लागल्याने आणि त्या पुरवूही लागल्याने माहिती तंत्रज्ञान उर्फ 'आयटी सेक्टर'मध्ये प्रचंड मनुष्यबळाची आवश्यकता भासली. इलेक्ट्रॉनिक इंजिनीअर सोडाच, तुलनेने अगदीच प्राथमिक पातळीवरचे संगणकीय अभ्यासक्रम उत्तीर्ण होणाऱ्यांनाही थोड्याफार उमेदवारीनंतर नोकऱ्या सहज मिळत राहिल्या. महत्त्वाचे म्हणजे आयटीमध्ये बहुतेक सर्वांनाच अगदी सुरुवातीपासूनच भरपूर पगार मिळू लागला. पगाराला 'पॅकेज' असे संबोधण्याची लाटही बहुधा आयटीमधूनच उगम पावली. परिणामी, करिअर म्हणजे आयटी असे नवे समीकरण प्रस्थापित झाले. अर्थात या गोष्टीलाही आता पंधरा-वीस वर्षे झाली आहेत. या गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये 'चेंज इज द ओन्ली कॉन्स्टंट थग' म्हणजेच 'बदल हीच सर्वात शाश्वत बाब आहे' या वाक्प्रचाराचा विसर पडू लागला. खरे तर संगणकीय विश्व इतक्या झपाट्याने बदलत आले आहे की, जुने तंत्रज्ञान किंवा पद्धती कालबाह्य होण्याचा वेग ('रोलओव्हर पीरिअड') इथे सर्वाधिक आहे. काही बाबतीत तर अक्षरशः गेल्या महिन्यातल्या प्रणालीची जागा या महिन्यात हाती आलेले नवतंत्रज्ञान घेते आहे. अर्थात इतके क्रांतिकारी बदल अत्युच्च पातळीवरच होत असले तरी कधी ना कधी शेवटच्या स्तरापर्यंत झिरपतात. त्यामुळेच आता संगणक साक्षरता ही कायम सुरू असणारी बाब बनली आहे.

# *काळजी आणि समर्थन : मानवी संवेदनांचा सामाजिक पाया*

२९ ऑक्टोबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन' हणून जाहीर केला आहे. २०२३ साली प्रथमच या दिवसाची घोषणा करण्यात आली आणि यामागचा उद्देश असा की, 'काळजी' आणि 'समर्थन' या मानवी जीवनातील मूलभूत पण अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या क्षेत्रांना जागतिक स्तरावर ओळख, मान्यता आणि धोरणात्मक प्राधान्य मिळावे. आजचा हा दिवस फक्त एक प्रतीकात्मक उत्सव नाही, तर तो मानवतेच्या अस्तित्वाचा, समाजाच्या एकतेचा आणि मानवी विकासाचा पाया असलेल्या काळजीच्या मूल्यांचा सामाजिक आराखडा आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर काळजी आणि समर्थन ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती समाजाच्या रचनेतील सर्वात महत्त्वाची सांस्कृतिक, आर्थिक व भावनिक संस्था आहे. समाजशास्त्रात एमिल दुर्खीम यांनी मांडलेले 'सामाजिक ऐक्य' (डेलळरश्र डेश्रळवरीळीूं) हे संकल्पनात्मक तत्त्व सांगते की प्रत्येक समाज टिकून राहण्यासाठी सदस्यांमधील नैतिक जबाबदारी, सहकार्य आणि परस्पर आदर आवश्यक असतो. काळजी आणि समर्थन ही या सामाजिक ऐक्याचीच व्यावहारिक रूपे आहेत. आपण जेव्हा दुसऱ्याच्या आरोग्याची, दुःखाची, वृद्धापकाळाची, अपंगत्वाची किंवा बालकांच्या संगोपनाची जबाबदारी घेतो, तेव्हा आपण समाजाच्या नैतिक आरोग्याला बळ देतो. दुर्खीमप्रमाणे, समाज हे केवळ कायद्याने किंवा शासनाने चालत नाही; ते चालते ते सामाजिक मूल्यांवर, आणि काळजी ही त्यातील सर्वात महत्त्वाची मूल्यव्यवस्था आहे.

इतिहासात पाहिले तर काळजीची संकल्पना मानवी जीवनात आदिम समाजापासून आहे. एकत्र कुटुंब व्यवस्था, गावसमाजातील परस्पर साहाय्य प्रणाली, धार्मिक दानसंस्था या सर्व काळजीच्या सामाजिक संस्थाच होत्या. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर आणि आधुनिकतेच्या प्रवाहात, घरगुती क्षेत्रातील काळजीचे काम हळूहळू आर्थिक मूल्यांशिवाय, अदृश्य व अवमूल्यित झाले. विशेषतः स्त्रिया या काळजीच्या कामात गुंतलेल्या राहिल्या, आणि या कामाला स्वाभाविक मानले गेले. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे 'लिंगाधारित श्रम विभाजन' म्हणून ओळखले जाते. स्त्रीवादी समाजशास्त्रज्ञ आर्ली होच्सचाइल्ड यांनी त्यांच्या "The Managed Heart' या ग्रंथात "Emotional Labour' ही संकल्पना मांडली. त्यांनी दाखवून दिले की स्त्रिया फक्त शारीरिकच नव्हे, तर भावनिक श्रम देखील सतत करतात, काळजी घेणे, समजून घेणे, सहानुभूती दाखवणे हे सर्व त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. परंतु या श्रमाचे ना आर्थिक मूल्यमापन होते, ना सामाजिक सन्मान मिळतो. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन' स्थापन करताना जगभरातील काळजी क्षेत्रातील असमानता आणि अवमूल्यन दूर करण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. णछ ठशीश्रीेंळेप -/ठएड/७८/२२० (२०२३) नुसार, काळजी आणि समर्थन क्षेत्रात गुंतवणूक वाढवणे, कामगार हक्कांचे संरक्षण करणे, आणि लिंगभाव समानतेला चालना देणे हे या दिनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जागतिक कामगार संघटना - २०२२) च्या 'उरीश रीं थेीज्ञ' अहवालानुसार, जगभरात सुमारे ३७७ दशलक्ष लोक काळजीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यापैकी ७६ टक्के महिला आहेत. परंतु त्यांना मिळणारे वेतन, सुरक्षा आणि सामाजिक मान्यता अत्यल्प आहे. भारतातील वास्तवही फार वेगळे नाही. घरगुती मदतनीस, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, वृद्ध व अपंगांच्या निगेसाठी काम करणाऱ्या महिला या सर्वजणी काळजी क्षेत्राचे अदृश्य आधारस्तंभ आहेत. त्यांच्या कामामुळे समाजाची आरोग्यव्यवस्था, शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य टिकून आहे, तरीही त्यांचे श्रम 'सेवा' म्हणून पाहिले जातात, 'काम' म्हणून नव्हे. अमर्त्य सेन यांनी त्यांच्या Capability -pproach मध्ये म्हटले आहे की व्यक्तीची क्षमता वाढवण्यासाठी समाजाला आधार आणि काळजी देणारी रचना आवश्यक आहे. जर समाजाने काळजीला प्राधान्य दिले नाही, तर विकास केवळ आकड्यांत मर्यादित राहतो, मानवी जीवनाच्या गुणवत्तेपर्यंत पोहोचत नाही. समाजशास्त्रज्ञ पियरे बोरदियू (Pierre Bourdieu) यांच्या डेलळरश्र उरळींरश्र संकल्पनेनुसार, समाजात परस्पर विश्वास, सहकार्य आणि सामंजस्य या घटकांमुळे सामाजिक भांडवल तयार होते. काळजी आणि समर्थन हे या सामाजिक भांडवलाचे मूळ आहे. ज्या समाजात काळजीचा अभाव आहे, तिथे तुटलेली नाती, एकाकीपणा आणि सामाजिक तणाव वाढतो. वृद्ध व्यक्तींना, अपंगांना किंवा आजारी लोकांना दुर्लक्षित करणारा समाज हा केवळ असंवेदनशीलच नाही, तर सामाजिकदृष्ट्या दुर्बलही ठरतो. म्हणून काळजी ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती समाजाच्या स्थैर्याचा, समावेशकतेचा आणि मानवतेचा पाया आहे. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत 'उरीश एलेपी' ही एक नवी संकल्पना उदयास आली आहे. ही अर्थव्यवस्था त्या सर्व सेवांवर आधारित आहे ज्या लोकांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कल्याणासाठी आवश्यक आहेत. जसे की आरोग्यसेवा, बालसंगोपन, वृद्धांची देखभाल, शिक्षण, मानसिक आरोग्य, आणि सामाजिक कार्य. णछ थोशप (२०२३) च्या अहवालानुसार, जर देशांनी काळजी क्षेत्रात फक्त २ टक्के ऋऊझ इतकी गुंतवणूक केली, तर पुढील दशकात कोट्यवधी नवीन रोजगार निर्माण होऊ शकतात. म्हणजेच, काळजी आणि समर्थन हे आर्थिक विकासाचेही साधन आहे. कोविड-१९ च्या काळात काळजी क्षेत्राचे खरे महत्त्व जगाने अनुभवले. डॉक्टर, नर्स, साफसफाई कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, स्वयंसेवक यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता समाजाला जिवंत ठेवले. पण या काळात त्यांना ज्या प्रकारे कमी वेतन, असुरक्षितता आणि थकवा सहन करावा लागला, त्यातून समाजातील काळजीच्या असमानतेचे चित्र समोर आले. ही महामारी एक आरसा होती, ज्यात आपल्याला दिसले की समाजाला चालवणारी खरी शक्ती 'काळजी'च आहे, आणि तिच्याशिवाय विकास, प्रगती, तंत्रज्ञान हे सर्व रिकामे आहेत. काळजी आणि समर्थन या संकल्पना समाजशास्त्रीयदृष्ट्या केवळ व्यक्तींमध्ये नव्हे, तर पिढ्यांमध्येही लागू होतात. वृद्धांचा सन्मान, बालकांचे संगोपन, अपंगत्वाचा स्वीकार, पर्यावरणाची काळजी ही सर्व पिढ्यानपिढ्यांची जबाबदारी आहे. इकोफेमिनिस्ट वंदना शिवा (तरपवरपर डहळींर) यांनी दाखवून दिले की स्त्रिया आणि निसर्ग या दोघांनाही काळजीच्या भावनेशी जोडले गेले आहे; म्हणून पर्यावरण संवर्धन, स्त्रीसशक्तीकरण आणि सामाजिक समता हे तिन्ही एकमेकांशी निगडित आहेत. काळजी म्हणजे केवळ व्यक्तीची नाही, तर पृथ्वीचीही जबाबदारी घेणे आवश्यक आहे. भारतीय सांस्कृतिक परंपरेत सेवा, ममता, दया, सहाय्य, करुणा ही मूल्ये काळजीच्या संस्कृतीचा भाग आहेत. या तत्त्वात सर्व जीवांची काळजी घेण्याची भावना अंतर्भूत आहे. परंतु दुर्दैवाने, आधुनिक काळात या मूल्यांचा प्रत्यक्ष सामाजिक आचरणात अभाव दिसतो. वृद्धाश्रमात राहणारे पालक, दुर्लक्षित अपंग नागरिक, मानसिक आरोग्याविषयी असलेला कलंक हे सर्व काळजीच्या संस्कृतीच्या क्षीणतेचे प्रतीक आहेत. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टीने काळजी ही नव्याने जागविण्याची गरज आहे. काळजी आणि समर्थन यांचे सामाजिक संस्थात्मकरण म्हणजेच धोरणात्मक पातळीवर त्यांना स्थान देणे. भारतात राष्ट्रीय आरोग्य मोहिमा, वृद्ध आरोग्य मिशन, बालविकास योजना, दिव्यांग कल्याण योजना, मानसिक आरोग्य धोरण अशा अनेक योजना काळजीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. मात्र या योजनांमध्ये कार्यरत असलेल्या महिलांच्या सन्मान, वेतन आणि सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. काळजी कामगारांना खङज उेपींशपींळेप १८९ अंतर्गत हक्क देणे, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, आणि प्रशिक्षण या बाबी सरकारच्या प्राधान्यक्रमात याव्यात. आजच्या डिजिटल समाजात काळजीचे स्वरूपही बदलले आहे. टेलिहेल्थ, ई-काउंसिलिंग, ऑनलाइन सपोर्ट नेटवर्क्स या नव्या माध्यमांमुळे काळजीचा आवाका वाढला असला तरी, मानवी स्पर्श हरवण्याची भीतीही निर्माण झाली आहे. समाजशास्त्रज्ञ झिग्मुंट बाऊमन (नूर्सीपीं ईरीरप) यांनी 'डळीींळव चेवशीपळीूं' मध्ये म्हटले आहे की आधुनिक समाजात नाती द्रवरूप झाली आहेत, म्हणजेच स्थिरता, बांधिलकी आणि सहानुभूती कमी झाली आहे. म्हणून काळजीची नवी संस्कृती उभारण्यासाठी डिजिटल जगातही मानवी संवेदना जपणे आवश्यक आहे. 'आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन' आपल्याला स्मरण करून देतो की काळजी हा विकासाचा पाया आहे. जेव्हा एक समाज आपल्या सर्वात दुर्बल घटकांची काळजी घेतो, तेव्हा तो खरोखर प्रगत ठरतो. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात कुटुंब, शिक्षण, आरोग्य, कामकाज, राजकारण, पर्यावरण यांची काळजी आणि समर्थन ही केंद्रस्थानी असली पाहिजेत. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे, तर काळजी ही मानवी नातेसंबंधांची सामाजिक संस्था आहे; ती तुटली, तर समाजाचे मूल्यतंत्रच ढासळते.

शेवटी, काळजी आणि समर्थन म्हणजे केवळ भावनिक क्रिया नाही, तर ती एक सामाजिक, आर्थिक आणि नैतिक गुंतवणूक आहे. काळजी घेणारा समाज हा केवळ सभ्यच नव्हे, तर सशक्त, समावेशक आणि संवेदनशील समाज असतो. म्हणूनच आजच्या या दिवसाचे महत्त्व असे की आपण काळजीला दया म्हणून नव्हे, तर सामाजिक न्याय म्हणून पाहिले पाहिजे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

# संक्षिप्त

## पैठण येथील युवक बेपत्ता

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ विटभट्टीवर काम करणारा युवक पैठण येथून दि.३ पासुन बेपत्ता आहे, याबाबत पैठण पोलिसांत इसम हरवल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे. याबाबतची पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, कृष्णा शिवाजी ढोले वय २५ रा. इंदिरानगर, पैठण हा दि.३ ऑक्टोंबर रोजी सकाळी ७ वा. शहागड कमान येथे दीपक अल्लाड यांच्या वीटभट्टीवर व गणेश खेडकर यांच्या ट्रॅक्टरवर तुकडे व विटा भरण्याचे काम आहे असे सांगून घातून गेला. तो रात्री ८ पर्यंत आला नाही म्हणून त्याचा भाऊ दत्ता ढोले हा चौकशीसाठी गेला. त्याने नातेवाईक मित्रांकडे तपास केला असता तो मिळून आला नाही म्हणून त्याची आई फुलाबाई शिवाजी ढोले यांनी पैठण पोलिसांत हरवल्याबाबत तक्रार दिली. त्यानुसार कृष्णा शिवाजी ढोले वय २५, बांधा सडपातळ, उंची ५ फुट, अंगात पिवळा शर्ट, जिन्स पॅण्ट, पायात चप्पल,मराठी हिंदी भाषा बोल-तो. अशा वर्णनाचा इसम आढळून आल्यास पोलीस निरीक्षक एम.बी. गोमारे (मोबाईल क्रमांक-९०४९९८०७५५), व तपासी अंमलदार पोहेकॉ गायकवाड (मोबाईल क्रमांक-८८८८८३९०५०) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज निकाली काढा-सहा.संचालक कोकरे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. पात्र विद्यार्थ्यांचे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्याची प्रक्रिया ३० जून पासून सुरु झाली आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क, शियवृत्ती, परीक्षा शुल्क योजनेचे आवेदनपत्र महाविद्यालयांनी भरुन सहायक संचालक इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग यांच्या कार्यालयात मंजूरीसाठी पाठवावयाचे आहेत. शिष्यवृत्ती अर्ज हे महाडीबीटी पोर्टलच्या लॉगईन मध्ये अल्प प्रमाणात भरण्यात आले आहेत. तरी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी स्वतः विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन लॉगईन करावे. एकही विद्यार्थी शिष्यवृत्ती लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी,असे सहाय्यक संचालक दयानंद कोकरे यांनी कळविले आहे.

## महाराष्ट्रात 'अमृत'तर्फे दीपावलीमध्ये होणार विश्वविक्रमी दुर्गोत्सव

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या दुर्ग, गड यांचा सार्थ अभिमान अवघ्या भारतदेशाला आहे. दर दिवाळी सणामध्ये बच्चेकंपनी मातीचे किल्ले बनवून छत्रपतींच्या कार्याचे स्मरण आणि अभिवादन करत असते. याच दुर्गांच्या प्रतिकृती साकारण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र संसोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात 'अमृत'ने दुर्गोत्सवाचे आयोजन या दीपावलीमध्ये केले आहे. हा एक विश्वविक्रम करण्याचा संकल्प अमृतने केला आहे. शिवछत्रपतींच्या पराक्रमांचे साक्षीदार असलेल्या १२ दुर्गांना युनेस्कोच्या जागतिक वारसाच्या वास्तूंमध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या प्रयत्नांना यश आले आणि साऱ्या महाराष्ट्राचा ऊर अभिमानाने भरून आला. दर वर्षी दिवाळीच्या सुट्टीमध्ये घरोघरी बालदोस्त आणि तरुण, ज्येष्ठ मंडळीसुद्धा दुर्गांच्या प्रतिकृती साकारतात. नागरिकांनी आपल्या अंगणात, बाल्कनीमध्ये, हाऊसिंग सोसायटीच्या सार्वजनिक जागांमध्ये अगदी जमेल तिथे या १२ दुर्गंपैकी कोणतीही एक हुबेहूब प्रतिकृती बनवावी आणि आपल्या संकेतस्थळावर http://www.durgotsav.com त्यासोबतचे सेल्फी पाठवावेत. दुर्गोत्सवात सहभागी झालेल्या साऱ्यांच्या चित्रांचे संकलन केले जाईल. तसेच या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांनाच माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने अभिनंदन पत्र पाठवण्यात येणार आहे. याशिवाय अमृतने निर्माण केलेल्या यामध्ये स्वराज्यरक्षक दुर्ग, शिवरायांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना, कवी भूषण यांची कवने, स्वराज्यासाठी लढलेल्या स्वराज्ययोद्ध्यांच्या परिचयाची शृंखला या साऱ्या गोष्टींचा आस्वाद सहभागी होणाऱ्या साऱ्यांना मिळेल.

**या बारा दुर्गंपैकी एक साकारा प्रतिकृती**

**रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेरदुर्ग, खांदेरीचा दुर्ग, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड, पद्मदुर्ग (सुवर्णदुर्ग).**

यामध्ये आपण १० नोव्हेंबर पर्यंत आपण यात सहभाग घेउ शकता. सेल्फी मध्ये गडदुर्ग चा जास्तीत जास्त भाग दिसेल असा असावा.. दुर्गोत्सव २०२५ या कार्यक्रमाचे अनावरण शिवश्रुष्टी हिस्टोरिकल थीम पार्क पुणे येथे अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांचे हस्ते पार पडले. या कार्यक्रमात अमृत चे विशेष कार्यकारी अधिकारी श्रीराम बेंडे, प्रवीण पांडे आणि सिद्धेश्वर वरणगावकर आणि राज्य व्यवस्थापक दीपक जोशी ,छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे उप-स्थित होते. या कार्यक्रम दरम्यान महाराष्ट्रात जास्तीत जास्त आबालवृद्धांनी गडदुर्ग बनवून, त्यासह सेल्फी काढून, दुर्गोत्सवाचे संकेतस्थळावर अपलोड करून, शिवरायांना अनोखी मानवंदना देऊया, या असे आवाहन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय जोशी यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना

## जिल्ह्याचा कृती आराखडा सर्वसमावेशक करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजने अंतर्गत देशा-तील १०० आकांक्षित जिल्ह्यात राज्यातील ९ जिल्ह्यांचा समावेश असून त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्हाही समाविष्ट आहे. या योज-नेचा जिल्ह्याला अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी जिल्ह्याचा कृती आराखडा विहित मुदतीत व सर्वसमावेशक करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे दिले.



प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात आज जिल्हा कृती समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा जलसंधारण अदिकारी एन.पी. कटके, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, सहा. आयुक्त पशुसंवर्धनडॉ. रमण इंगळे, कृषी विज्ञान केंद्र संचालक डॉ. दीप्ती पाटगावकर, उद्योग निरीक्षक ए.एस. जरारे आदी उपस्थित होते.


प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश असून त्यात कृषी उत्पादकता वाढविणे, पीक विविधीकरण, पीक घनतेत वाढ, नैसर्गिक व सेंद्रीय शेतीला चालना, पाणी व्यवस्थापन, पीक काढणी पश्चात साठवणूक आणि मूल्यवर्धन, दीर्घ व अल्प मुदतीच्या कर्जाची सुविधा अशा पद्धतीच्या उपाययोजनांद्वारे कृषी विकास योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेत कृषी व फलोत्पादन, कृषी संशोधन व शिक्षण, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सहकार विभाग, जलसंपदा, उद्योग, ग्रामविकास, भूजल संचालनालय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभाग शा ११ विभागांच्या योजनांच्या अभिसरणातून हा जिल्हा कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

जिल्ह्याचा कृती आराखडा तयार करतांना संबंधित विभागांनी आपल्या विभागामार्फत राबवावयाच्या उपाययोजना, अंमलबजावणीचे टप्पे, त्यातून साध्य करावयाची उद्दिष्टे याबाबींचा अंतर्भाव करावा. जिल्ह्याचा कृती आराखडा सर्वसमावेशक करुन तो विहित मुदतीत सादर करावा,असे निर्देश यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. जिल्ह्याच्या कृती आराखड्यात कौशल्य प्रशिक्षण आणि कृषी पुरक उद्योग यांची सांगड घालावी, अन्न प्रक्रिया उत्प-ादने याबाबींची मूल्यवर्धित साखळी तयार करण्यासाठी शेतकरी प्रशिक्षण अशा शाश्वत उपाययोजनांचा समावेश करावा,असेही त्यांनी सांगितले.

## माल वाहतुक व्यावसायिकांची पैठण एम आय डी सी तील शिवम वजन काट्या विरुद्ध तक्रार

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिपंळवाडी प्रतिनिधि/ हारून शेख** / पैठण एम आय डी सी तील स्थित असलेल्या शिवम वजन काट्यावर सहा वाजुन सतरा मिनटाला इम्रान शेख या व्यावसायिकाने लोडेड गाडीचे वजन केले असता सहा टन तीनशे नव्वद इतका आला. त्यामधुन गाडीचे वजन तीन चारशे कमी केले असता मालाचा वजन दोन टन नऊशे नव्वद इतके आले,यावरुन इम्रान शेख यांना काट्यावर संशय आला,त्यांनी तीच गाडी साई धरम काट्यावर वजन करण्यासाठी सहा वाजुन चोवीस मीनीटला लावली.तेव्हा लोडेड गाडीचे वजन सात टन चारशे दहा इतके आले गाडीचे वजन तीन चारशे कमी केले असता मालाचे वजन चार टन दहा इतके आले.यावरुन असे समजुन येते की शिवम वजन काट्यावर एक टन वीस किलो कमी तर साई धरम काट्यावर एक टन वीस किलो जास्त वजन भरत आहे तर व्यावसायिकांनी विश्वास नेमका कोणत्या काट्यावर ठेवावा, असे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. दोन्ही मधुन दुरूस्त काटा कोणता ? असा प्रश्न व्यावसायिकांना पडला आहे. इम्रान शेख यांनी घडलेल्या घटने नुसार शिवम वजन काट्याविरुध्द मा. निरीक्षक वैधमापन शास्त्र पैठण विभागाकडे आपली तक्रार केली असुन अन्न नागरी पुरवठा विभाग मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त संभाजीनगर, जिल्हा अधिकारी संभाजीनगर येथे ही सुचित करण्यात आले आहे अशी माहीती इम्रान शेख या व्यावसायिकाने दिली.शिवम वजन काट्याचे चालक अरुण मिश्रा यांनी अशी प्रतिक्रिया दिली की माझा काटा व्यवस्थित आहे बाकी काट्या मध्ये चुक असु शकते. वैधमापन शास्त्र पैठण विभागाचे निरीक्षक यांनी याबाबी कडे गंभीर तेने लक्ष देवन व्यावसायिका सोबत न्याय करावा आणि व्यावसायिकांना गोंधळ मुक्त करावे वजन काट्याच्या निरीक्षणासाठी एक समिति नेमावी आणि भ्रष्ट काट्याचा परवाना रद्द करुन चालक व मालक यांच्यावर रीतसर कारवाई करण्यात यावी अशी व्यावसायिकांची मागणी आहे.




## राज्य शिक्षक पात्रता परीक्षा दि.२३ रोजी; ३७ केंद्रांवर २४ हजार ३८५ परीक्षार्थींची व्यवस्था

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ रविवार दि.२३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. जिल्ह्यातील २४ हजार ३८५ परीक्षार्थीसाठी दोन सत्रात ३७ केंद्रांवर या परी-क्षेची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर परी-क्षार्थींना पुरेशा सुविधा उपलब्ध करुन द्याव्या व परीक्षा केंद्रावर आवश्यक सुरक्षा व अन्य व्यवस्थांची सज्जता ठेवावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ च्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण, जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य.) आश्विनी लाठकर, जिल्हा शिक्षणाधिकारी (योजना) अरुण शिंदे,जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या अधिव्याख्याता सुजाता भालेराव, सहा. पोलीस आयुक्त डॉ. भागिरथी पवार, शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ थोरे तसेच अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ रविवार दि.२३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यासाठी जिल्ह्यात ३७ केंद्रांवर व्यवस्था करण्यात आली आहे.सकाळचे सत्र सकाळी साडेदहा ते दुपारी १ व दुपारचे सत्र दुपारी अडीच ते सायं.५ अशा दोन सत्रात परीक्षा होणार आहे.

सकाळच्या सत्रात ११ हजार १३४ तर दुपारच्या सत्रात १३ हजार २५१ परीक्षार्थी परीक्षा देतील. चार माध्यमांत ही परीक्षा होईल. परीक्षेच्या नियोजनासाठी ९ झोन करण्यात आले आहेत. एकूण ४३ केंद्रसंचालक या परी-क्षेचे कार्यान्वयन करतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.



जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, परीक्षा शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पडाव्या. त्यासाठी दिलेल्या निर्देशांचे पालन व्हावे. सुरक्षा, सुविधांची उपलब्धता करण्यात यावी. परीक्षार्थींना प्रवेशपत्रावर परीक्षा केंद्राचा पुरेसा व बिनचुक पत्ता द्यावा. परीक्षार्थींची गैरसोय होऊ नये याची पुरेपुर काळजी घ्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

## विश्वासाचं नाव - संजय जाधव!. विकासाचं प्रतिक. नगराध्यक्ष. गंगापूरचा हक्काचा माणूस चर्चेला उधाण



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/ सुभान शहा/** गंगापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शहरा-तील राजकारणात मोठी हालचाल सुरू झाली आहे. सध्या कोणत्याही पक्षाने अधिकृत उमेदवार जाहीर केलेला नसला तरी गंगापूरच्या प्रत्येक गल्लीत, प्रत्येक मनात एकच नाव घुमत आहे - मा. संजय विठ्ठलराव जाधव! चर्चेला उधाण

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) तर्फे नगराध्यक्षपदासाठी संजय जाधव यांना प्राधान्य दिले जाण्याची शक्यता अधिक असून, पक्ष कार्यकर्ते व नागरिक या निर्णयाकडे उत्सुकतेने पाहत आहे. जनतेचा आवाज - सत्ता असो वा नसो, काम फक्त संजयचं दिसतं! गेल्या १० वर्षांपासून सत्त-ेपासून दूर असतानाही, संजय जाधव यांनी गंगापूर शहरात अनेक मूलभूत व सार्वजनिक विकासकामांना गती दिली आहे. त्यांच्या पुढाकारातून पूर्ण झालेल्या आणि सुरू असलेल्या काही उल्लेखनीय कामे -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते राजीव गांधी चौक सिमेंट रस्ता, मुख्य बाजारपेठेतील पथदिवे प्रकल्प, मंदिर-मस्जिद वि कास योजना, शाळा व रुग्णालय परिसरातील सु-धारणा उपक्रम,सामाजिक संस्थांना दिलेला पाठिंबा. अशी माहिती संजय जाधव यांनी दिली पुढील नगराध्यक्ष पदावर निवडून आल्यानंतर पुन्हा जनतेसाठी जनतेच्या हितासाठी ज्या मूलभूत सुविधा जनतेला पाहिजे त्या सगळ्या मी उपलब्ध करून देईल. अशी माहिती संजय जाधव यांनी दैनिक आत्ताच एक्सप्रेस चे प्रतिनिधी सुभान शहा यांच्याशी बोलताना सांगितले. पुढे म्हणाले जनतेचा माणूस, जनतेसाठीचं काम हेच माझे काम कोरोना काळात मी स्वतःच्या खर्चाने गरजू नागरिकांना अन्नधान्य, औषधे आणि आवश्यक साहित्य पोहोचवून खऱ्या अर्थाने 'जनसेवा म्हणजेच ईश्वरसेवा' या विचाराची प्रचिती दिली. त्याच काळात गंगापूर शहरा-तील नागरिकांनी अनुभवलेला त्यांचा आधार आणि संवेदनशीलता आजही जनतेच्या मनात कोरलेली आहे.

गंगापूर पुन्हा तेजाकडे - संजय जाधव विकासाच्या नव्या अध्यायाची सुरुवात! गंगापूरचा सर्वांगीण विकास, नागरिकांचा विश्वास आणि पारदर्शक प्रशासन हेच संजय जाधव यांचे ध्येय राहिले आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली गंगापूर शहराचा चेहरा बदलला आहे आणि नागरिकांमध्ये नव्या उत्साहाची लाट पसरली आहे.

## एसटी बसवर बोर्ड नसल्यामुळे व प्रवासी यांना निवारा व बसण्यासाठी जागा नसल्याने प्रवाशांची गैरसोय

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/ सुभान शहा/** गंगापूर शहरातील बस स्टॅन्ड येथे मागील काही दिवसापासून बस स्टॅन्ड चे विकास काम सुरू असल्यामुळे प्रवासी यांना भर पावसाळ्यात व आता देखील पावसाळ्याचे दिवस संपले आहे तरीसुद्धा परवासीयांना बसण्यासाठी व सावळीची व्यवस्था नसल्यामुळे प्रवासांची गैरसोय होत असल्याची चर्चा आहे. तसेच एसटी बसेस वर बोर्ड नसल्यामुळे प्रवाशांना गाडी कुठे जाणार हे कळत नसल्याने प्रवासांना वाहक चालक यांना विचारावा लागत आहे की ही गाडी कुठे जाणार आहे. गाडीवर बोर्ड नसल्याने






प्रवाशांची गैरसोय होत असल्याची चर्चा आहे. गंगापूर बस स्टॅन्ड येथे प्रवाशांना सध्या कोणतीही सोय सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांनी मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली आहे. गंगापूर तालुक्यातील मोठं बस स्टॅन्ड असूनदेखील प्रवाशांना बसण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध नाहीत. आणि दररोज मोठ्या प्रमाणावर प्रवासी या ठिकाणी एसटी बसमध्ये प्रवास करत असतात परंतु गंगापूर बस स्टँड वरील प्रवाशांना बसण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना उन्हामध्ये व सावळीचा निवारा पहात जागा शोधावे लागून वेळ काढावा लागत आहे. गंगापूर बस स्टँड वरील बस स्टँड चे विकास काम अत्यंत कासव गतीने सुरू असल्याची चर्चा आहे. लवकरात लवकर हे काम पूर्ण करून प्रवाशांना मिळणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी प्रवासी करतं आहे.नागरिक, विद्यार्थी व प्रवासी यांना उन्हात, पावसात रस्त्याच्या कडेला उभं राहून बसची वाट पाह-ावी लागते. व एसटी बसवर बोर्ड नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. या गंभीर समस्येची दखल घेत प्रशासनाने तातडीने या ठिकाणी प्रवाशांसाठी निवाऱ्याची व सोय सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## शेतकऱ्याची वाट बिकट ! मातोश्री पांदन रस्ते कागदावर मातोश्री पांदन रस्ता कामात कडेठाण खुर्द ग्रामपंचायतने केला भ्रष्टाचार

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण प्रतिनिधी** / पैठण तालुक्यातील गेवराई मर्दा कडेठाण खुर्द ग्रामपंचायत मातोश्री पांदन रस्ता बांधकामात शेतकऱ्यांच्या वाटा बिकट अवस्थेत; भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांचे चिंताजनक परिमाण उघड होत आहे. पैठण तालुक्यातील कडेठाण खुर्द ग्रामपंचायत मधील गेवराई मर्दा सरकारी विहीर ते जायभाये सर यांच्या शेतापर्यंत मातोश्री पांदन रस्ता बांधकाम प्रकल्पात मोठ्या प्रमाणात *भ्रष्टाचाराचे आरोप* स्थानिक शेतकऱ्यांकडून करण्यात आले आहेत. या कामाच्या निकृष्ट गुणवत्तेने आणि निधीच्या गैरवापरामुळे शेतकऱ्यांची जीवनं दुःखी असून स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. या रस्त्यांचं विकासाकरिता शासनाने सुरू केलेल्या 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना'मुळे शेतकऱ्यांचे शेतमाल शहरांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असं आश्वासन होतेय. मात्र, कार्यान्वयनात घोटाळ्यामुळे या ग्रामीण लोकांच्या गरजा अधोगतीला गेल्या आहेत.

***भ्रष्टाचाराचे स्वरूप आणि त्याचा गहिवर परिणाम***

पैठण तालुक्यातील कडेठाण खुर्द ग्रामपंचायत आणि इतर आसपासच्या गावांमध्ये मातोश्री पांदन रस्त्यांच्या बांधकामात अनेक *अनियमितता* उघडकीस आल्या आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, कामाच्या दर्जात घट करून, मूळ साहित्याचा आणि निधीचा गैरवापर केला आहे. काही ठिकाणी सक्तीने माती टाकून व अन्य साहित्य गायब करून, भिंती न खोदता नाली मारून, रस्ता केवळ कागदोपत्री अस्तित्वात आहे. परिणामस्वरूप रस्ते पावसाळ्यात वाहून जातात आणि दुष्काळी काळात वाहतुकीसाठी अपुरा ठरतात. या निमित्ताने शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात पोहोचविण्यात मोठा त्रास होत असल्याचे आक्षेप लोकांनी व्यक्त केले आहेत. मातोश्री पांदन रस्त्यांचे काम अधपान असून, ही योजना व्यर्थ ठरू शकते, जर तत्परपणे चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई न करण्यात आली तर, ग्रामस्थांच्या सोबत पंचायत समिती पैठण येथे आंदोलन करू असे ग्रामस्थ यांनी सांगितले. तसेच, ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यावर देखील या घोटाळ्याचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी आहे.

***शेतपट्ट्यांना जोडणाऱ्या या रस्त्यांच्या निकृष्टतेनं शेतमाल बाजारपालिकांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग कठीण झाला असून, आर्थिक नुकसान वाढले आहे. यामुळे शेतकऱ्यांचा विकास मागे पडतो व भविष्यातील उत्पादनावरही परिणाम होतो. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.या बाबत वरिष्ठ अधिकारी पंचायत समिती बीडीओ मनोरमा गायकवाड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी उत्तर देण्यास नकार दिला व नंतर फोन बंद आला.***

***मुलभूत योजनेचा हेतू आणि समस्या***

राज्य शासनाने २०२१ मध्ये सुरू केलेली 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना' ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी शेतमाल वाहतुकीस सुलभ आणि दर्जेदार रस्ते तयार करण्यासाठी आहे. या योजनेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या योग्य मानकानुसार रस्त्यांचे बांधकाम करणे अपेक्षित असले तरी, प्रत्यक्ष काम ठराविक ठिकाणी



मानकांच्या विपरीत झाले असल्याचे निदर्शनास आले आहे. ग्रामपंचायत आणि रोजगार हमी अंतर्गत निधीच्या चुकीच्या व्यवस्थापनामुळे अनेक ठिकाणी कामाचे बिल काढले जात असून,कडेठाण खुर्द ग्रामपंचायत हद्दीत मुळ काम नीट केले जात नाही. शेतकरी यामुळे वर्गणीकरून काम करत आहे, नुकसान सहन करत आहेत तसेच, ग्रामीण विकासावरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

***सरकार आणि प्रशासनाची भूमिका***

प्रशासनाने ग्रामस्थांच्या तक्रारींवर सातत्याने ध्यान देणे गरजेचे असून, सद्यस्थितीची तातडीने पूर्ण चौकशी करत दोषींवर कार्यवाही करावी, ही मागणी स्थानिक नेते तसेच ग्रामस्थ करत आ-हेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने गुणवत्ता चाचणी, मर्जीविना काम थांबविणे आणि पारदर्शक निधी नियोजन करून त्रुटी दूर करण्याचा समर्पक टप्पा आरंभ केला पाहिजे.

## संक्षिप्त

### ३ नोव्हेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. तरी जालना जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. ३ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ठिक १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे. लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचित करण्यात येत आहे. लोकशाही दिनात न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापना विषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असेही कळविले आहे.

# नागरिकांनी ई-कचरा संकलन अभियानात सहभाग नोंदवावा - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / जिल्हाधिकारी कार्यालय व नॅचर इको बिल्डींग प्रायव्हेट लिमिटेड या केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ नोंदणीकृत संस्थेच्या सहकार्याने जिल्हास्तरीय ई-कचरा संकलन अभियान दि.२८ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्याकडे असलेला ई-कचरा जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य सभागृहात जमा करुन या अभियानात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

भारतामध्ये दरवर्षी १.६ दशलक्ष टनापेक्षा अधिक ई-कचरा निर्माण होतो या कचऱ्यापैकी बऱ्याच कचऱ्याची विल्हेवाट ही अनाधिकृत मार्गाने केल्याने त्याचे गंभीर परिणाम पर्यावरणावर होताना दिसून येत आहेत. जिल्हातील नागरिकांना ई-कचऱ्याचा वैज्ञानिक व पर्यावरणपुरक निपटारा करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी दि.२८ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत भारत सरकारच्या खाण मंत्रालय व जवाहरलाल नेहरुन ल्युमिनीयम रिसर्च डेव्हलपमेंट ण्ड डिझाईन सेंटरच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छतोत्सव अभियानांतर्गत नेचर इको बिल्डींग प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयात ई-कचरा संकलन अभियान आयोजित करण्यात आले आहे. सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाच्या कार्यालयातील आपल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या घरातील वापरात




नसलेले संगणक, प्रिंटर, मॉनिटर, मोबाईल, बॅटरी, युपीएस, फॅक्स मशिन, स्कॅनर आदि ई-कचऱ्याचे वर्गीकरण करुन जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य सभागृहात संकलन करावे. ई-कचरा संकलन करतेवेळी मुल्य प्रति युनिट/किलो प्रमाणे दिले जाणार आहे. ई-कचरा संकलन अभियानाचा उद्देश कार्यालयामधून तसेच घरगुती स्तरावर निर्माण होणारा ई-कचरा सुरक्षित आणि पर्यावरणपुरक पध्दतीने संकलित करुन त्याचा योग्य निपटारा करणे हा आहे. ई-कचरा उघड्यावर फेकणे, जाळणे किंवा तोडफोड केल्याने त्यातील शिसे, पारा, कॅडमियम इत्यादी विषारी घटक माती, हवा आणि भुजलात मिसळून प्रदुषण निर्माण करतात व सार्वजनिक आरोग्यावर दुष्परिणाम करतात.

नोंदणीकृत पुनर्वापरकर्त्याकडे ई-कचरा सुपूर्द केल्यास प्रदुषण रोखता येते तसचे पुनर्वापर योग्य धातू व घटक सुरक्षितरित्या पुर्नप्राप्त करता येतात. अशी माहितीही त्यांन यावेळी दिली.

### इतर मागासवर्गीय महामंडळाकडून ५० लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाखांचे बिनव्याजी कर्ज वाटपाच्या प्रस्तावास मान्यता

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून जिल्ह्यातील ५० लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज वाटपाच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि.२८) संपन्न झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

लाभार्थ्यांचे प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षेत बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीस महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक सवाई राठोड यांच्यासह संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या उपक्रमाचा उद्देश समाजातील इत्तर मागासवर्गीय घटकांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे आहे. या उपक्रमामुळे मागासवर्गीय समाजघटकांना आर्थिकदृष्ट्या बळकटी मिळून रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. इतर मागास-वर्गीय वित्त व विकास महामंडळ निवड केलेल्या ५० लाभार्थीमध्ये ओबीसी महामंडळाचे ३४ लाभार्थी तर संत काशिबा गुरव महामंडळाचे ०४ लाभार्थी, शैक्षणिक कर्ज ०१ लाभार्थी, संत सेनानी महाराज महामंडळाचे ०५ लाभार्थी, संत नरहरी महाराज महामंडळाचे ०३ लाभार्थी, संत श्री संताजी महाराज महामंडळाचे ०२ लाभार्थी आणि सोळा कुलस्वामिनी महामंडळाचे ०१ लाभार्थ्यांचा समावेश असून या प्रस्तावास जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिली आहे. यानंतर हे सर्व प्रस्ताव पुढील मंजूरीकरीता व्यवस्थापकीय संचालक इतर मागासवर्गीय महामंडळ, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात येणार आहेत. त्यानंतर लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाखाचे बिनव्याजी कर्ज वाटप करण्यात येणार आहे.

# जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता असल्याने दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

आत्ताच एक्सप्रेस

जालना प्रतिनिधी / प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूच-नेनुसार जालना जिल्हयात दि. २८ व २९ ऑक्टोबर २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) येण्याची शक्यता वर्तवली आहे.

तसेच दि. ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ रोजी हलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांनी दक्षता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत अस-ताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये.

वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मर जवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा.

बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी, जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरिकांनी वादळी वारे, विजेपासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तह-सील कार्यालय, पोलीस ठाणेशी संपर्क साधावा, असेही जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### हयातीचे प्रमाणपत्र सादर करावेत - जिल्हा कोषागार अधिकारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / राज्य शासनाचे सर्व निवृत्तीवेतन धारक, कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांनी दरवर्षी माहे नोव्हेंबरमध्ये हयातीचे दाखले बँकेत सादर करणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने हयात प्रमाणपत्राची संगणकीकृत यादी कोषागारातून बँकेत पाठविण्यात आली आहे.

सर्व निवृत्ती वेतनधारक, कुटुंब निवृत्ती वेतन धारकांनी त्यांचे हयात असल्याचे प्रमाणपत्र दि. १ नोव्हेंबर, २०२५ नंतर संबंधीत बँकेत ओळखपत्राच्या पुराव्यासह जावून दि. १५ नोव्हेंबर, २०२५ पुर्वी द्यावे. तसेच जीवन प्रमाणन प्रणालीवर आपला हयातीचा दाखला अचुक माहिती नोंदवून सुध्दा करता येईल. शक्य न झाल्यास प्रत्यक्ष कोषागारात हजर राहून हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे, अन्यथा डिसेंबरचे निवृत्तीवेतन थांबविण्यात येईल. असे जिल्हा कोषागार कार्यालय, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.




# वनमजुरांच्या न्यायासाठी संघटना सज्ज

## सेवासातत्य, नुकसानभरपाई व समितीविरोधात निवेदने दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / सामाजिक वनीकरण विभागातील कामगारांना न्याय मिळावा यासाठी मराठवाडा सर्व श्रमिक संघटनेचा संघर्ष सातत्याने सुरू आहे. दि. २७ ऑक्टोबर रोजी संघटनेच्या पदाधिकारी व वनमजुरांनी मा. विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांच्या अनुपस्थितीत मुख्य लेखापाल यांना महत्त्वपूर्ण निवेदने सादर केली.

पहिल्या निवेदनाद्वारे, मा. कामगार न्यायालय जा-लना (औ.वी.अ.) येथील दाखल प्रकरणामधील दि. २१/०७/२०२५ रोजीच्या निकालानुसार, संबंधित वन मजुरांना सेवासातत्यासह मूळ पदावर पुनर्स्थापना करून, तसेच मधल्या कालावधीतील वेतन मागणी पोटी नुकसानभरपाईची रक्कम अदा करण्याची मागणी करण्यात आली. दुसऱ्या निवेदनामध्ये वनमजूर संजय गोफणे यांच्या बाजूने मा. कामगार न्यायालय जालना (औ.वी.अ.) निकाल दिला आहे. परंतु त्यांचे १३ डिसेंबर २०२४ रोजी निधन झाले असून, संघटनेने त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मी संजय गोफणे यांना वारसा हक्कानुसार सर्व हक्क व लाभ मिळावेत तसेच अनुकंपा तत्त्वावर सेवेत पुनर्नियुक्ती देण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

तिसऱ्या निवेदनात संघटनेने सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांनी नुकतीच गठीत केलेल्या समितीविरोधात हरकत नोंदवली आहे. विभागाने ३०/०९/२०२५ रोजी स्थापन केलेल्या समितीत मराठवाडा सर्व श्रमिक संघटनेचा सहभाग न घेता एकतर्फी रचना केली असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.



ही संघटना वर्षानुवर्षे सामाजिक वनीकरण मजुरांच्या न्यायासाठी कार्यरत असून, संघटनेमार्फत उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात थ.झ/५११८/१९९५ प्रकरण दाखल करून न्यायालयीन लढा देण्यापर्यंतचे काम संघटनेने केले आहे. त्यामुळे संघटनेचा समितीत समावेश होणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.


या प्रसंगी संघटनेतर्फे कॉम्रेड सोहम प्रकाश बोडवडे (संयुक्त सचिव) यांच्या नेतृत्वाखाली कॉम्रेड शंकर लोखंडे तालुकाध्यक्ष, कॉम्रेड गणेश जाधव तालुका उपाध्यक्ष, वनमजूर प्रतिनिधी सुंदराबाई साठे, शेषराव भालेराव, सोनाजी घारे, सुंदर बोराडे व इतर उपस्थित होते. निवेदन स्वीकारताना मुख्य लेखा-पाल यांनी निवेदनांची नोंद करून विभागीय वनाधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्याचे आश्वासन दिले. संघटनेने स्पष्ट केले की, सामाजिक वनीकरण मजुरांच्या सेवासातत्य, थकीत वेतन, आणि न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी हा आमचा प्राथमिक मुद्दा आहे. लढा अखेरपर्यंत सुरू राहील

## जालना येथे प्रथमच संत श्री गुलाबराव महाराज चरित्र कथा व सामूहिक पारायण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/तीर्थक्षेत्र चांदुरबाजार येथील संत श्री गुलाबराव महाराज यांच्या पालखीचे मंगळवार दि. ११ नोव्हेंबर रोजी जालना शहरात आगमन होत असून, यानिमित्त प्रथमच दोन दिवस भरगच्च आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संत गुलाबराव महाराज पारायण ग्रुप आणि माहेश्वरी महिला मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

पालखी आगमनानिमित्त सोमवार दि. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत प्रसीद्ध कथाकार प. पू. श्याम नारायणदासजी चौबे यांच्या रसाळ वाणीतून संत श्री गुलाबराव महाराज चरित्र कथा होणार असून, सायंकाळी ५:३० वाजता मुख्य पोस्ट ऑफिस रोडवरील साई डायग्नोस्टिक सेंटर येथे पालखीचे आगमन होणार आहे. या ठिकाणी पादुकाचे पाद्यपूजनानंतर रूपम हॉलपर्यंत शोभायात्रा काढण्यात येणार असून, मंगळवार दि. ११ नोव्हेंबर रोजी याच ठिकाणी सकाळी ८.३० ते दुपारी २ या वेळेत संत गुलाबराव महाराज पारायण ग्रुप आणि माहेश्वरी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुलाब गौरव ग्रंथाचे सामूहिक पारायण होणार आहे. त्यात सर्वधर्मीय महिला, पुरुष, युवक- युवतींना सर्वांना सहभागी होता येईल. या ठिकाणी पालखी मुक्कामी राहणार असून, बुधवारी ती श्री क्षेत्र आळंदीकडे प्रस्थान करणार आहे.



श्री गुलाबराव महाराज हे विसाव्या शतकातील एक असामान्य अलौकिक संत हो-ते. त्यांना वयाच्या आठव्या महिन्यात अंधत्व आले होते. मराठी, हिंदी व संस्कृत भाषेवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. गुलाबराव महाराज यांनी काव्यशास्त्र, आयुर्वेद, संगीत इत्यादी अनेक विषयांवर लेखन केलेले आहे. संस्कृत, हिंदी, मराठी या भाषांतून व वऱ्हाडी बोलीतून त्यांनी १३३ ग्रंथ लिहिले. सूत्रग्रंथ, भाष्य, प्रकरण, निबंध, प्रश्नोत्तरे, पत्रे, आत्मचरित्र, आख्याने, नाटक, लोकगीते, स्तोत्रे, व्याकरण, कोश वगैरे वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळले. २७ हजार ओव्या, २५०० अभंग, २५०० पदे, ३००० श्लोकादी रचना इत्यादींचा त्यांत समावेश आहे.

सामूहिक पारायणामध्ये सहभागी होण्यासाठी निर्मला साबू व विजया मोहता यांच्याकडे नाव नोंदणी करून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संत गुलाबराव महाराज पारायण ग्रुप आणि माहेश्वरी महिला मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813